Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 7, Jan. 2013
**ISSN:-2231-5063**

Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

# ''एच.आय.व्ही./एड्स रूग्ण कामगारांचा व सामान्य कामगारांचा चिंता मापणाचा तुलनात्मक अभ्यास''

**V.N.CHAUDHARI**

HOD,Department of Psychology
Chhatrapati Shahu College, Lasur Station
Ta.Gangapur Dist.Aurangabad

***सारांश***

एड्स म्हटल्यावर भल्याभल्यांची पाचावर धारण बसते इतका या रोगाचा धसका अनेकांनी घेतलेला आहे. आणि खरच हा रोग आहेच तसा भस्मासूराप्रमाणे वाढत आहे.
एड्स म्हणजे (A.I.D.S.) Acquired Immuno Deficiency Syndrome अर्थात एड्स म्हणजे प्राप्त केलेल्या रोग प्रतिकारशक्तीच्या अभावामुळे निर्माणहोणा–या लक्षणांचासमूह/समुच्ययहोय !

***चिंता :–***

जागतिकीकरणामुळे प्रचंड प्रमाणात स्पर्धा निर्माण झाली आहे. या गतिमान जीवनामुळे व्यक्तिमध्ये मोठया प्रमाणात चिंता निर्माण होत आहे. याचा परिणाम व्यक्तीचे सामाजिक स्वास्थ, कौटुंबिक स्वास्थ बिघडत चाललेले आहे.

''असुखद व प्रक्षुब्ध अशी मनोशारिरीक अवस्था म्हणजे चिंता होय'' स्वप्रभुत्व प्रास्तापित करण्यात आलेल्या अपयशामुळे चिंता निर्माण होते.

एड्स कामगार व सामान्य कामगार या दोन्ही कामगारांमध्ये चिंता अनुभवण्यात काहीफरकदिसतोकाय?तेजाणून घेण्याच्या हेतूने प्रस्तुत संशोधन हाती घेण्यात आले.

यामध्ये औरंगाबाद शहरातील कामगारांचा सहभाग प्राप्त झाला. कामगारांचा वयोगट 25 ते 35 या दरम्यान घेतला. त्यासाठी एकूण 60 कामगारांची चाचणी घेतली त्यापैकी 30 कामगार एड्स रूग्ण तर 30 कामगार हे सामान्य होते. चिंता मापनासाठी सिन्हा व सिन्हा यांची चिंता मापन चाचणी (SCAT) वापरली. प्रस्तुत संशोधनात असे दिसून आले की, सामान्य कामगारांपेक्षा एड्स रूग्ण कामगारांमध्ये चिंतेचे प्रमाण लक्षणीय दिसून आले.

***प्रस्तावना :–***

जागतिकीकरणामुळे प्रचंड प्रमाणात स्पर्धा निर्माण झाली आहे. रोजगाराकरिता कामगारांचे मोठया प्रमाणात स्थलांतर होत आहे. त्यातून एड्स सारखा भयानक आजार कामगारांमध्ये सर्वात जास्त प्रमाणात आढळून येतो. एच.आय.व्ही /एड्स म्हणजे मृत्यु असे समीकरणच तयार झाले आहे. एच.आय.व्ही./एड्स रूग्ण कामगारांमध्ये आणि सामान्य कामगारांमध्ये चिंता मापनाचा तुलनात्मक अभ्यास करण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध निबंधामध्ये करण्यात आला आहे.

चिंतेचे परिणाम शरीरावर होतात व त्यामुळे कामगारांची क्षमता कमी होते, या संबंधात डॉ.विल्यम ॲडलर ने बरेच संशोधन केले आहे. ''असुखद व प्रक्षुध्द अशी मनोशारीरिक अवस्था म्हणजे चिंता होय'' (ॲडलर)

एड्स म्हणजs (A.I.D.S.) Acquired Immuno Deficiency Syndrome

अर्थात प्राप्त केलेल्या रोगप्रतिकार शक्तीच्या अभावामुळे निर्माण होणा–या लक्षणांचासमूह/समुच्ययहोय ! हा HIV (Human Immuno Deficiency Virus) मुळे निर्माण होणारा रोग आहे. त्यामुळे प्रतिकार शक्ति कमी होत असल्यामुळे एड्स रूग्ण कामगारांची क्षमता कमी व्हायला लागते. क्षमता कमी झाल्यामुळे हातातील रोजगार जाण्याची चिंता कामगारामध्ये निर्माण होते असे दिसून आले.

***नमुना निवड –***

प्रस्तुत संशोधनासाठी 30 पुरूष एच.आय.व्ही./एड्स रूग्ण कामगारांची व 30 पुरूष सामान्य कामगारांची निवड केली आहे.

***वयोगट –***

चाचणी घेण्यात आलेले पुरूष कामगार हे 25 ते 35 वयोगटातील होते.


**Title:** *''एच.आय.व्ही./एड्स रूग्ण कामगारांचा व सामान्य कामगारांचा चिंता मापणाचा तुलनात्मक अभ्यास''*
**Source:Golden Research Thoughts [2231-5063] V.N.CHAUDHARI yr:2013 vol:2 iss:7**

*फलिते –*

कामगारांच्या चिंतामापनाची टककेवारी

| कामगार | अतिचिंता | मध्यम चिंता | सामान्य चिंता |
|---|---|---|---|
| एड्स रूग्ण | 26 | 03 | 01 |
| सामान्य | 11 | 10 | 09 |

एच. आय. व्ही. / एड्स रूग्ण कामगार व सामान्य कामगारांच्या चिंतामापनाचा आलेख




*चाचणी –*

या संशोधनासाठी सिन्हा व सिन्हा यांची चिंतामापन (SCAT) चाचणी वापरली. या चाचणीची विश्वसनीयता, मुल्य 0.92 व वैधता गुणांक 0.62 आहे.

फलिताचीचर्चा :कामगारांच्या चिंतामापनाचा अभ्यास करून सांख्यिकीय 0.01 व 0.05 या पातळीवर साथ आहे. म्हणजेच एच.आय.व्ही./एड्स रूग्ण कामगार व सामान्य कामगारांच्या चिंतामापनामध्ये लक्षणीय फरक दिसून आला आहे. तक्त्यानुसार एच.आय.व्ही./एड्स रूग्ण कामगारांच्या चिंता सामान्य कामगारांपेक्षा अधिक असतात असे आढळले.

एच.आय.व्ही./ एड्स कामगाराबरोबरच चर्चा केली असता, मृत्युची भिती, रोगप्रतिकारक शक्ती कमी, नोकरी जाण्याची चिंता, समाजाचा बघण्याचा बदलेला दृष्टीकोन, मित्र नातेवाईकांचे दूरावत चाललेले संबंध, एड्स रूग्ण आहे असे समजल्यावर इतर व्यक्तीचे वर्तन, भविष्यात असुरक्षितता, तीव्र स्पर्धा,ऋणात्मक दृष्टिकोन, विकृतकौटूंबिकआकृतीबंध, व्यसनाधिनताअंधश्रध्दा या सर्वबाबींचा एकत्रितपणे विचारकेला असता चिंतेचेप्रमाण वाढल्याने शारिरीक मानसिक समस्यानिर्माणहोतात. यामुळेआत्महत्या करणे,गुन्हेगारी करणे या सारख्या समस्या मोठया प्रमाणात निर्माण होऊ शकतात.

*निष्कर्ष :*

प्रस्तुत संशोधनानुसार एच.आय.व्ही./एड्स रूग्ण कामगार,सामान्य कामगारांपेक्षा अधिक प्रमाणात चिंता करतात.

*उपाययोजना :*

1.प्रत्येक उद्योगधंद्यामध्ये कामगारांचे मानसशास्त्रीय चाचण्याव्दारे मुल्यमापन करून दिसून आलेल्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी मानसशास्त्र विषय असलेल्या व्यक्तिच्याच नेमणूका कराव्यात.
2.योगासन, प्रणायाम, ध्यान व विशेशता चिंता कमी करण्यासाठी शिथिलीकरण (Relaxation) तंत्राचा उपयोग करावा.
3.उद्योगक्षेत्रामध्ये कामगाराकरिता एच.आय.व्ही./एड्स मार्गदर्शन व समुपदेशन केंद्राची स्थापना करावी.

4.एच.आय.व्ही./एड्स रूग्ण कामगारांप्रतीसमाजाचाअसलेला ऋणात्मक दृष्टिकोन व पूर्वग्रह दूर करण्यासाठी, समाज प्रबोधन, कार्यशाळा, जनजागरण रॅली, प्रसिध्दी माध्यमांचा वापर करावा.

*सारांश :*

कामगारांचे जीवन चिंतामुक्तअसले तरच ते अपेक्षित कार्यामध्ये यश संपादन करून सुसमायोजित जीवन जगू शकतील. एच.आय. व्ही./एड्स रूग्ण कामगारांच्या सामान्य कामगारांपेक्षा चिंता अधिक प्रमाणात असतात यासाठी वेळीच उद्योग विश्वामध्ये मार्गदर्शन केंद्राची स्थापना करावी.

*मर्यादा :*

हा अभ्यास फक्त पुरूश कामगार, शहरी उद्योगापुरताच मर्यादित करण्यात आला आहे

*संदर्भ ग्रंथ :*

1.डॉ. मिनाक्षी राजहंस, प्रा.अनघा पाटील, डॉ.सुशिल सुर्वे, प्रकाशक – अपसामान्याचे मानसशास्त्र, उन्मेश प्रकाशन.
2.बडगुजर, मनोविकृती मानसशास्त्र महालक्ष्मी पुस्तकालय, नाशिक
3.डॉ.ए.ए.कादरी, मानसिक स्वास्थ, प्रकाशक, श्रीमती.अंजुम कादरी,औरंगाबाद.
4.डॉ.रा.र.बोरूडे, संशोधन पध्दतीशास्त्र पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन, पुणे
5.प्रा.जयगोपाल त्रिपाठी, मनोवैज्ञानिक अनुसंधान पध्दती, विनोद पुस्तक मंदिर आग्रा
6.डॉ.जगन्नाथ दिक्षीत, डॉ.अंजली दिक्षीत, लैंगिक शिक्षण, सांकेत प्रकाशन, प्रा.लि.औरंगाबाद.
7.महाराष्ट्रराज्य एड्स कंट्रोल सोसायटी मुंबई, एच.आय.व्ही. आणि एड्सची माहिती.
8.G.R. Blum, J.C. Nayeler CBS, Industrial Psychology Publication and Distributers, Delhi.
9.M,.L. Blum J.C. Nayeler CBS, Industrial Psychology Publication and Distribution Delhi.